# Arts, Science & Commerce College Kolhar

# वित्तीय व्यवस्थापन

**Dr. Shelke D.S.**

# वित्तीय व्यवस्थापन : व्याख्या, स्वरुप आणि व्याप्ती

- सर्व साधारण व्यवस्थापनशास्त्रामधील वित्तीय व्यवस्थापन हे एक महत्वाचे कार्य आहे. वित्तीय व्यवस्थापनाचा संबंध वित्तपुरवठा आणि उपलब्ध पैशांचा व्यवसायसंस्थेची सर्वसाधारण उद्दीष्टे मिळविण्याच्या दृष्टीने परिणामकारक वापर कसा करता येईल, या घटकांशी असतो.
- वित्तीय व्यवस्थापन क्षेत्रात व्यक्तिगत प्रेरणा आणि संस्थात्मक पातळीवर उद्दीष्टे साध्य करण्यासाठी घेतलेल्या वित्तीय निर्णयांचा समावेश होतो.

# वित्तीय व्यवस्थापनाचे स्वरुप

- वित्तीय व्यवस्थापनाचे स्वरुप स्पष्ट करतांना वित्तीय व्यवस्थापनाशी निगडीत अशा अर्थशास्त्र आणि हिशोबशास्त्र, लेखापालन, त्यांची कार्य, पध्दती , उद्दीष्टे आणि व्याप्ती यांचाही विचार करणे क्रमप्राप्त ठरते.
- आधुनिक काळात वित्तीय व्यवस्थापनाचा अर्थ केवळ निधी – संकलपना एवढाच मर्यादित नसून, निधी संकलपनाच्या बरोबरच जगमान्य अशा साधनांचा योग्य वापर कसा करता येईल, याचाही विचार केला जातो.

- १) आंतरराष्ट्रीय वित्तीय व्यवस्थापन :-

आजच्या जागतिकीकरणाच्या युगामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या कंपन्यांचे वित्तीय व्यवस्थापन कशा पद्धतीने चालते याविषयीची माहिती असणे आवश्यक आहे. तसेच भारतीय रुपया व इतर देशातील चलन यांचा परस्परसंबंध, रुपयाचे मूल्य कशा पद्धतीने ठरते इ. महत्त्वाच्या विषयांसंबंधीचे ज्ञान असायला हवे. इतर देशांच्या चलनाचे मूल्य आपल्या रुपयाच्या तुलनेत वाढले किंवा कमी झाले तर त्याचा परिणाम आपल्या अर्थव्यवस्थेवर काय होतो याची माहिती असणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय भागबाजारामधे भारतीय कंपन्या कशाप्रकारे भांडवल उभारणी करू शकतात, याचाही समावेश या विषयामध्ये होतो.

- २) भारतीय भांडवल बाजार (Indian Capital Market) :

कंपन्यांना भाग-भांडवल सुलभरित्या उभे करता यावे, यासाठी सक्षम भांडवल बाजार असणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी आपल्या देशातील भांडवल बाजाराची रचना कशा पद्धतीची आहे या भागाचा समावेश या विषयामध्ये होतो. याशिवाय भांडवल बाजाराची नियंत्रक म्हणून सेबीची भूमिका, सेबीने घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे, भांडवल बाजारातील इतर घटक, कंपन्यांना भागबाजारामध्ये (Stock Exchange) नोंदणी करण्यासंबंधीचे नियम, मनीमार्केट व कॅपिटल मार्केट यांमधील फरक आदी महत्त्वाचे विषय यामध्ये समाविष्ट केलेले असतात.

## वित्तीय व्यवस्थापनाची वैशिष्टे :-

- वित्तीय व्यवस्थापनाचा संबंध व्यवसायाच्या आर्थीक बाजुशी असतो. भांडवलाची उपलब्धता, वापर, नियंत्रण, मुल्यमापन व अंदाजपत्रक तयार करणे अशा सर्व बाजु त्यात समाविष्ट होतात.
- वित्तीय व्यवस्थापन हा एकूण व्यवस्थापनाचा स्वतंत्र भाग असतो, पण व्यवसायाचा आणि त्याचा अतुट संबंध असतो.
- तसेच वित्तीय नियोजन करता यावे त्यासाठी याचा उपयोग होतो.

# वित्तीय व्यवस्थापनाची व्याप्ती

- वित्तीय व्यवस्थापन हा एकुण व्यवसाय व्यवस्थापनाचा एक भाग असतो. व्यवसायाचा व्याप जसा वाढत जातो तशी वित्तीय व्यवस्थापनाची व्याप्ती वाढत जाते.
- सर्व आर्थिक कार्याशी वित्तीय व्यवस्थापनाचा संबंध पोहचतो.
- सर्व आर्थिक कार्यांत गरजांचे अचुक अनुमान करणे, भांडवलाच्या गरजा भावण्यासाठी विविध पर्यायी मार्गांची चाचपणी करणे.

- आधुनिक आर्थिक दृष्टीकोनाच्या व्याख्या
- वित्तीय व्यवस्थापन म्हणजे संघटनेच्या उद्दीष्टांच्या अनुषंगाने निधीची प्रभावीरीत्या उभारणी व कार्यक्षमतेपणे उपयोग.
- निधीचा वापर व नियंत्रण कौशल्याने करणे म्हणजे वित्तीय व्यवस्थापन होय.

# धन्यवाद